27-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/26/2025 10:43 PM Page 1



# एसजीपीडीए स्वच्छता रखडल्याने डासांची पैदास

## नागरिकांमध्ये वाढती नाराजी | मडगाव नगरपरिषदेची बेफिकीरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरणाने (एसजीपीडीए ) मडगावच्या किरकोळ बाजारातील वाढत्या अस्वच्छतेबाबत मडगाव नगर परिषदेच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त करत तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

सततच्या लेखी आणि तोंडी निवेदनांनंतरही नगरपरिषदेने कोणतीही ठोस कारवाई न केल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. बाजारात साचलेला कचरा, पावसाळ्यात तुंबणारे पाणी आणि दुर्गंधीमुळे नागरिक, व्यापारी तसेच अधिकारी त्रस्त झाले आहेत.



ही एक गंभीर नागरी यंत्रणांची अपयशाची केस आहे, असे प्राधिकरणाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. बाजाराचे व्यवस्थापन आमच्याकडे असले तरी कचरा संकलन आणि विल्हेवाट लावणे ही एमएमसीची जबाबदारी आहे. परंतु ती पूर्णपणे झटकली जात आहे. असे या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे .

बाजारात व्यवसाय करणारे व्यापारीही या समस्येमुळे हवालदिल झाले आहेत. फळविक्रेते सलीम शेख यांनी सांगितले की , आम्ही सर्व प्रकारची कर आणि फी नियमित भरतो, पण बाजाराची अवस्था फारच बिकट आहे. ग्राहक दुर्गंधीमुळे इकडे फिरकायलाही तयार नाहीत.

स्थानिक रहिवाशांनीही अस्वच्छतेविरुद्ध संताप व्यक्त केला.ताजे भाज्या वा मांस खरेदी करणे दूरच, बाजारातून चालणेही अशक्यप्राय झाले आहे, असे एका ग्राहकाने सांगितले.

कचऱ्याचे ढिगारे, तुंबलेली गटारे आणि डासांची वाढती पैदास हे सार्वजनिक आरोग्याला धोका ठरू शकतात, असे आरोग्य क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. पावसाळ्यात डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा धोका अस्वच्छ परिसरामुळे अधिकच वाढतो.

दरम्यान, मडगाव नगरपरिषदेचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या विषयावर काहीही बोलण्यास नकार दिला. यामुळे संतप्त व्यापाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना अधिकच वाढली आहे.

प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार, महापालिकेच्या पाठबळाशिवाय त्यांनी फारसे काही करू शकत नाही. बाजार व्यवस्थापनात त्यांची भूमिका मर्यादित आहे, तर कचरा व्यवस्थापनाची कायदेशीर जबाबदारी एमएमसीवर आहे.आम्ही हा मुद्दा आता महापालिका प्रशासन संचालनालयाकडे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे नेण्याचा विचार करत आहोत, असे एसजीपीडीएच्या सूत्रांनी सांगितले.

मडगावमधील महत्त्वाच्या व्यावसायिक केंद्रांपैकी एक असलेला किरकोळ बाजार सध्या कचरा संकटाने त्रस्त आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असून व्यापारी, ग्राहक आणि स्थानिक नागरिक तातडीने हस्तक्षेप करून स्वच्छता आणि सुरक्षितता पुनर्स्थापित करण्याची मागणी करत आहेत.






# फातोर्डा घाऊक मासळी बाजारात फॉर्मेलिन तपासणीचा अभाव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** फातोर्डा येथील घाऊक मासळी बाजारात सध्या फॉर्मेलिन तपासणीसंदर्भातील निष्क्रियतेमुळे पुन्हा एकदा गंभीर चिंता व्यक्त होत आहे. एकेकाळी अत्यंत काटेकोर तपासणी प्रक्रियेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या बाजारात अलीकडे अन्न व औषध प्रशासनाची उपस्थिती केवळ औपचारिकतेपुरती उरली असल्याची भावना विक्रेते आणि ग्राहकांमध्ये निर्माण झाली आहे.

गोव्यात पूर्वी मासांमध्ये फॉर्मेलिनचा वापर उघड झाल्यानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर एफडीएकडून मासळीवर तातडीने आणि सक्रीय चाचण्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र अलीकडच्या काळात तपासणीची तीव्रता आणि कर्मचारीसंख्या दोन्ही घटल्याचे स्पष्ट झाले आहे.

पूर्वी ८–१० अधिकारी नियमित तपासणी करत, आता केवळ ३–४ जण दिसतात आणि तेही फक्त कधी कधी, असे एका स्थानिक विक्रेत्याने सांगितले. तपासणीची प्रक्रिया केवळ वरवरची वाटते, ती परिणामकारक राहिलेली नाही.

स्थानिक मासळी विक्रेते रेमेडियस फर्नांडिस यांनी हेराल्डशी बोलताना आपली स्पष्ट नाराजी व्यक्त केली.गेल्या काही वर्षांपूर्वी, आम्हाला प्रत्येक मालाच्या तपासणीसाठी अधिकारी सतत भेटत असत. आता खरेदीदार आमच्यावर विश्वास ठेवतात, पण तपासणीशिवाय तो विश्वास टिकणार कसा ? असे ते म्हणाले .

दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरणाच्या हद्दीत येणाऱ्या या बाजारात दररोज मासळीने भरलेली वाहने मोठ्या संख्येने येत आहेत. यापैकी काही वाहने थेट स्थानिक विक्रेत्यांना माल पुरवतात, कोणतीही गुणवत्ता चाचणी न करता. अशा परिस्थितीत फॉर्मेलिनसारख्या घातक रसायनांची उपस्थिती तपासली जात नसल्याने जनतेच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आम्हाला खात्री हवी की आमच्या खाण्यातील मासे सुरक्षित आहेत, असे बाजारातील नियमित ग्राहक सेड्रिक परेरा यांनी सांगितले. एक काळ होता, जेव्हा एफडीएच्या तपासणीमुळे निश्चिंत वाटत असे. आज मात्र पुन्हा अनिश्चिततेचे वातावरण आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मासळी खरेदी–विक्रीत वाढ झाली असताना, ही निष्क्रियता अधिकच धोकादायक ठरू शकते. विक्रेते आणि ग्राहक दोघांच्याही सततच्या तक्रारी असूनही, एफडीएने अजूनही फॉर्मेलिन तपासणीच्या यंत्रणेला पूर्वीच्या ताकदीने पुन्हा कार्यान्वित केलेले नाही.

या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांकडून तातडीची कारवाई होणे गरजेचे असल्याची जोरदार मागणी होत आहे. स्थानिक पातळीवरील निरीक्षणे, प्रवेशद्वारांवरील तपासणी आणि नियमित फॉर्मेलिन चाचण्यांमुळेच या घातक घटकांपासून संरक्षण शक्य आहे, हे पुन्हा अधोरेखित होत आहे.

गोव्याच्या किनारी संस्कृतीमध्ये मासळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे मासे सुरक्षित आणि दर्जेदार असावेत, ही केवळ ग्राहकांची नव्हे तर आरोग्यदृष्ट्या संपूर्ण समाजाची अपेक्षा आहे. अन्न सुरक्षा ही फक्त वैधानिक बाब नाही, तर ती सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंधित जबाबदारी आहे.

एफडीएने त्वरीत पावले उचलावीत आणि गोमंतकीयांना फॉर्मेलिनमुक्त मासे मिळतील याची हमी द्यावी,असा स्पष्ट संदेश आता ग्राहक व विक्रेत्यांकडून दिला जात आहे. प्रशासनाने यावर वेळीच लक्ष केंद्रित केले नाही, तर पुन्हा एकदा जनतेचा रोष ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सुरावली येथे कुजलेल्या मासळीची विक्री : आमदारांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** फातोर्डा घाऊक मासळी बाजाराजवळील सुरावली सीमेजवळ कुजलेले आणि निकृष्ट दर्जाचे मासे बेकायदेशीरपणे विकले जात असल्याचे उघड झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आल्याचा आरोप करत नागरिकांनी आणि आमदार वेंझी व्हिएगस यांनी तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच उपजिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए ) अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. यावेळी आमदार व्हिएगस स्वत: उपस्थित होते. त्यांनी बेकायदेशीर विक्रीला आळा घालण्याचे आवाहन अधिकाऱ्यांना केले.

या प्रकारामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. कुजलेले मासे खुलेआम विकले जात आहेत आणि प्रशासन दुर्लक्ष करत आहे. मी दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांकडे त्वरित कारवाईची मागणी करतो, असे आमदार व्हिएगस यांनी स्पष्ट केले.



फातोर्ड्याचे रहिवासी मिलाग्रेस फर्नांडिस यांनी स्वतः हस्तक्षेप करत कुजलेल्या माशांची विक्री उघडकीस आणली. जे मासे नष्ट करायला हवेत, तेच खुलेआम विकले जात आहेत. कोणतीही गुणवत्ता तपासणी होत नाही. हा सरळ सरळ अन्न सुरक्षा कायद्याचा भंग असून जनतेच्या आरोग्याशी खेळ आहे, असे फर्नांडिस यांनी हेराल्डशी बोलताना सांगितले.

फर्नांडिस यांच्या मते, बाहेरून मासे आणणारे काही वाहतूकदारही या साठ्याला 'वापरासाठी अयोग्य' असल्याचे मान्य करत आहेत. त्यांनी यासंदर्भात सुरावली पंचायतीकडे आणि आरोग्य अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या असल्या तरी, कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

सध्या सुरू असलेल्या मासेमारी बंदीच्या काळात गोव्याबाहेरील काही व्यापारी राज्यातील मासळी टंचाईचा गैरफायदा घेत निकृष्ट दर्जाचे मासे विक्रीस आणत असल्याची शक्यता फर्नांडिस यांनी व्यक्त केली. ही घटना अपवाद नाही, तर सवयीचा भाग बनत चालली आहे, असा इशारा त्यांनी दिला.

या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण पसरले आहे. अशा प्रकारांवर तात्काळ कारवाइ करण्यात यावी,दोषींवर कठोर दंड आकारण्यात यावा,सीमावर्ती भागात नियमित तपासणी केली जावी,आणि अन्न सुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळले जावेत अशा मागण्या नागरिकांनी प्रशासनाकडे केल्या आहेत .

प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेतली गेली असली, तरी अद्याप ठोस कारवाईची प्रतीक्षा आहे. जिल्हा प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पुढील कृतीकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.ही घटना केवळ मासळी विक्रीशी संबंधित नसून, ती सार्वजनिक आरोग्य, अन्न सुरक्षा आणि प्रशासनाच्या जबाबदारीशी थेट संबंधित आहे. अशा प्रकारांना थारा न देण्यासाठी आता कडक पावले उचलण्याची वेळ आली आहे, अशी नागरिकांची भूमिका आहे.

# खाजन जमिनींच्या पुनरुज्ञीवनासाठी शास्त्रज्ञ–शेतकरी संवाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** गोव्यातील शतकानुशतके जुन्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या खाजन जमिनींच्या पुनरुज्ञीवनासाठी तांत्रिक आणि धोरणात्मक उपाय शोधण्याच्या उद्देशाने आयसीएआर–सेंट्रल कोस्टल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट (आयसीएआर ) ) ने नुकताच शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद मेळावा आयोजित केला. या उपक्रमात खाजन जमिनींवर कार्यरत शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ आणि धोरणनिर्माते एकत्र आले होते.



या संवादात खाजन जमिनींच्या सध्याच्या स्थितीवर चिंता व्यक्त करण्यात आली. ही जमिनी प्रामुख्याने खाऱ्या पाण्याच्या प्रभावाखालील सखल भागात असून पारंपरिकरित्या भात शेती आणि मत्स्यपालनासाठी वापरली जात होती. परंतु बदलत्या हवामान, अनियमित पर्जन्यमान, मातीचा ऱ्हास आणि बदलत्या भू–वापर पद्धतीमुळे या क्षेत्रांवर संकट ओढावले आहे. यामुळे पारंपरिक पद्धतींऐवजी विज्ञानाधिष्ठित उपायांची गरज निर्माण झाली आहे, असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

आमच्यासाठी आता विज्ञान हे केवळ पर्याय नाही, तर गरज बनली आहे. खाजन नष्ट होत आहेत आणि त्यांच्यासोबत आपली संस्कृतीही, असे एका स्थानिक शेतकऱ्याने स्पष्टपणे सांगितले.

राज्यसभा खासदार सदानंद तानावडे यांनी संवादात सहभागी होत शाश्वत शेती पद्धती स्वीकारण्यावर भर दिला. त्यांनी आयसीएआरआय ला खाजगी तांत्रिक मदतीसह प्रदेश–विशिष्ट उपाय सुचवण्याचे आवाहन केले.

सांत आंद्रेचे आमदार वीरेश बोरकर यांनी खाजन जमिनीच्या पुनरुज्ञीवनात येणाऱ्या अडचणी मांडताना सांगितले की, या जमिनींवरील अनेक गुंतागुंतीचे मालकी हक्क हे प्रमुख अडथळे आहेत. या जमिनींचे अनेक मालक असल्याने विकास प्रकल्पांवर गती येत नाही. त्यांनी विभागीय समन्वयाच्या माध्यमातून प्रशासकीय अडथळे दूर करण्याची आवश्यकता सांगितली.

आयसीएआर चे संचालक डॉ. परवीन कुमार यांनी संस्थेच्या संशोधनाची रूपरेषा मांडताना सांगितले की, खारट किनारी भूभागासाठी आम्ही स्थानिक गरजांनुसार तांत्रिक मॉडेल तयार केली आहेत. पारंपरिक ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधून खझान परिसंस्था पुनरुज्ञीवित करणे हे आमचे प्रमुख ध्येय आहे.

या मेळाव्यात नाबार्ड गोवाचे महाव्यवस्थापक संदीप धारकर यांनीदेखील सहभाग घेतला. त्यांनी सांगितले की, नाबार्ड आयसीएआर सोबत सहकार्य करून शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य शेती मॉडेल्ससाठी निधी उपलब्ध करून देण्यास तयार आहे. केवळ पर्यावरण पूरक नाही, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणारे उपाय विकसित करणे हे आमचे लक्ष्य आहे.

राज्य कृषी संचालक संदीप फळदेसाई यांनी सरकारच्या पाठिंब्याची पुनरुच्चार करत सांगितले, शेतकऱ्यांना उत्पादनक्षमतेकडे परत नेण्याचा प्रयत्न प्रशासन करत आहे. या संवादातून मिळालेली माहिती आणि प्रतिक्रिया आम्ही सरकारपुढे ठोस प्रस्ताव स्वरूपात मांडू.

या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण ठरले तेआयसीएआर चे रिष्ठ मृदशास्त्रज्ञ डॉ. गोपाल महाजन यांचे सादरीकरण. त्यांनी खाजन जमिनींसाठी तयार केलेल्या वैज्ञानिक पद्धतींचे पॅकेज सादर केले. यामध्ये बहुपीक प्रणाली, मत्स्यपालन आणि कृषी–पर्यटन यांचा समावेश असलेली समग्र शेती योजना मांडली गेली, जी उत्पन्नवाढीसह जोखमीचे व्यवस्थापनही सुनिश्चित करेल.

हा संवाद म्हणजे केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता,खाजन जमिनींच्या पुनरुज्ञीवनासाठी एका दीर्घकालीन योजनात्मक प्रक्रियेचा प्रारंभ आहे. खाजन ही गोव्यासाठी केवळ भूखंड नसून एक सांस्कृतिक, आर्थिक आणि पर्यावरणीय ठेवा आहे यावर या चर्चेत शिक्कामोर्तब झाले .

# सालपे तलाव परिसरात सलग तिसऱ्या वर्षी भात लागवडीला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २६ :** नावेली मधील सालपे तलाव परिसर पुन्हा एकदा हरित आच्छादनाने सजला असून, या भागात सलग तिसऱ्या वर्षी भात लागवडीला जोरदार सुरुवात झाली आहे. गोव्यातील कृषी पुनरुज्ञीवनाच्या दिशेने सकारात्मक टप्पा ठरलेल्या या उपक्रमाचे नेतृत्व ' गोव्याचा धान्य माणूस' म्हणून ओळखले जाणारे फादर जॉर्ज क्वाड्रोस करत आहेत.

सालपे तलावच्या आसपासची पडीक शेतजमीन अलीकडच्या वर्षांपासून नव्या जोमाने पुनर्जीवित केली जात असून, या वर्षी जवळपास ३ लाख चौरस मीटर क्षेत्रफळावर भात लागवड करण्यात येणार आहे. हे शेत अनेक दशकांपासून वापरात नसले तरी, या चळवळीमुळे नव्याने जीव धरत आहे .

ही केवळ शेती नाही, तर गोव्याच्या हरवत चाललेल्या ग्रामीण वारशाचे पुनरुज्ञीवन आहे, असे फादर क्वाड्रोस यांनी नमूद केले. या जमिनीला आणि एकमेकांवर विश्वास ठेवून आम्ही पुढे चालत राहिलो, आणि आज आमचे प्रयत्न फळाला आले आहेत.

या यशस्वी उपक्रमामध्ये सालपे तलाव नावेली शेतकरी संघटन आघाडीवर असून, स्थानिक स्वयंसेवक, ग्रामस्थ आणि संस्थांचा सक्रिय सहभाग लाभला आहे. स्थानिक ग्रामपंचायत, विशेषतः ग्राम विकास समिती, तसेच कृषी विभाग , गोवा यांत्रिक शेती विभाग यांनीही सक्रिय पाठिंबा दिला आहे.शेतकरी गटाने स्पष्ट केले की, सार्वजनिक संस्थांचा आणि स्थानिक प्रशासनाचा पाठिंबा मिळाल्यामुळे आमच्या प्रयत्नांना गती आणि सातत्य मिळाले.

ही शेती काही दशकांपूर्वीपर्यंत संपन्न होती, पण कालांतराने पडीक राहिली. हवामान बदल, शहरांकडे झुकणारा कल, आणि पारंपरिक शेतीतून मागे पडलेली तरुण पिढी . या सर्व कारणांमुळे गोव्यातील अनेक शेते ओसाड झाली होती. मात्र सालपेमधील उपक्रमाने हा प्रवाह थांबवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

या उपक्रमात केवळ भात लागवडच नाही, तर सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जैवविविधतेचे संवर्धन आणि पाणलोट क्षेत्रांचे संरक्षण या बाबींवरही भर दिला जात आहे.या चळवळीतून पर्यावरण रक्षणाचा महत्त्वाचा संदेशही दिला जात आहे. शेतीमुळे केवळ जमीन नव्हे, तर संपूर्ण परिसंस्था जागृत होते. पाण्याचे साठे, पक्ष्यांचे अधिवास, आणि स्थानिक जैवविविधता यांचा समतोल राखण्यासाठी शेतजमिनींना पुन्हा सक्रिय करणे गरजेचे आहे, असे पर्यावरण अभ्यासक मानतात.

सालपे तलावच्या परिसरात सुरु असलेली ही चळवळ केवळ स्थानिक नव्हे, तर राज्यभरातील पडीक जमिनींना प्रेरणादायी ठरणारी आहे. शहरीकरणाच्या सावटाखाली दबलेल्या शेतीला नवसंजीवनी देणारा हा उपक्रम गोव्यातील तरुणांनाही शेतीकडे वळवणारा ठरू शकतो.


**OUR LADY OF THE ROSARY HIGHER SECONDARY SCHOOL, DONA PAULA – GOA**

**Invites applications from eligible candidates for filling up the following posts on regular basis.**

| Sr. No. | Name of the post | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Teacher Grade I in English & Political Science | M.A. in English & M.A. in Pol.Sc. with B.Ed. | 01 |
| 2 | Teacher Grade I in Economics & English | M.A. in Economics & M.A. in English with B.Ed. | 01 |
| 3 | Lower Division Clerk | Graduate with Computer Knowledge | 01 |
| 4 | M.T.S. | SSC/XII | 01 |

**Sr. No. 1 to 3 preferably female candidate**
**Sr. No 4 : Preferably male candidate**

Interested candidate as per Government Recruitment rules, may apply within 07days with full Bio data, application, testimonials, valid residence certificate , valid employment Card , birth Certificate and other certificates to the Manager, Our Lady of the **Rosary Higher Secondary School, Dona Paula -Goa.**